# ग्रामीण पोलीस झाले अधिक सक्षम

## १८ चारचाकी, ३१ दुचाकी वाहनांचे वितरण

वार्ताहर/ठाणे

ठाणे जिल्ह्यातील ग्रामीण पोलीस दल अधिक सक्षम करण्याच्या दृष्टीने चारचाकी आणि दुचाकी वाहने उपलब्ध करून देण्यात आली आहेत. यामाध्यमातून पोलिसांनी गस्तीचे प्रमाण वाढवितानाच गुन्हेगारी कमी करण्यासाठी त्याचा वापर करावा, असे आवाहन नगरविकासमंत्री तथा ठाणे जिल्ह्याचे पालकमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले.

जिल्हा नियोजन समितीच्या निधीतून ग्रामीण पोलिसांना १८ चारचाकी आणि ३१ दुचाकी वाहने वाटप करण्यात आली. त्याचा वितरण सोहळा येथील पोलीस कवायत मैदानावर झाला. त्यावेळी पालकमंत्री शिंदे बोलत होते.

या कार्यक्रमास केंद्रीय पंचायत राज राज्यमंत्री कपिल पाटील, खासदार राजन विचारे, आमदार रवींद्र फाटक, ठाणे जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा पुष्पा पाटील, जिल्हाधिकारी राजेश नार्वेकर आदी मान्यवर उपस्थित होते.

आपला जीव धोक्यात घालून पोलीस सामान्यांच्या रक्षणासाठी सदैव तत्पर असतात. सणा-समारंभात ते कुटुंबीयांपासून दूर राहून सामान्य नागरिकांच्या रक्षणाला प्राधान्य देत असतात, अशा कर्तव्यदक्ष पोलिसांच्या अडचणी समजून घेतानाच त्या दूर करण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत. त्याचाच एक भाग म्हणून जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून सुमारे दीड कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात आला. त्यातून पोलीस दलाला आवश्यक असलेली चारचाकी आणि दुचाकी वाहने घेण्यात आली.

पोलीस दल सक्षम करण्यासाठी जिल्हा नियोजन समितीद्वारे निधी उपलब्ध करून देतानाच पोलिसांना वाहने, सीसीटिव्ही कॅमेरे देण्यासाठी प्रयत्न करण्यात येत असल्याचे पालकमंत्री शिंदे यांनी सांगितले.

क्राईम रेट कमी करण्यासाठी पोलिसांनी प्रयत्न करावेत, सामान्य नागरिक जेव्हा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करायला येतात तेव्हा त्यांच्याशी सौजन्यपूर्वक वागणूक ठेवावी. पोलीस ठाण्यात अभ्यागत कक्ष तयार करावा, असे आवाहन मंत्री शिंदे यांनी यावेळी केले.

ग्रामीण पोलिसांना मिळालेल्या वाहनांच्या मदतीने गुन्हेगारी रोखण्यासाठी प्रयत्न करावेत, असे आवाहन केंद्रीय राज्यमंत्री पाटील यांनी यावेळी केले. दसरा सणाच्या आदल्या दिवशी पोलिसांना वाहने मिळाली आहेत त्यामुळे खऱ्या अर्थाने आज दसरा साजरा झाल्याचे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना पोलीस अधिक्षक देशमाने यांनी सांगितले, राज्य शासनाकडून ठाणे ग्रामीण पोलिसांना यापूर्वी सात चारचाकी वाहने मिळाली असून आज त्यात १८ चारचाकी आणि ३१ दुचाकी वाहनांची भर पडली आहे. ही वाहने ग्रामीण पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीतील ११ पोलीस ठाण्यांना मिळणार असून प्रत्येक पोलीस ठाण्याला चारचाकी दोन वाहने तर दोन ते तीन दुचाकी वाहने उपलब्ध होणार असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी पालकमंत्री शिंदे, केंद्रीय राज्यमंत्री पाटील व उपस्थित मान्यवरांच्या हस्ते वाहनांना हिरवा झेंडा दाखविण्यात आला. वाहनांचे यावेळी संचलन करण्यात आला. अप्पर पोलिस अधीक्षक स्मिता पाटील यांनी आभार मानले.





### गुन्हेगारांवर वचक बसवा : शिंदे

ठाणे जिल्हा भौगोलिकदृष्ट्या मोठा असून ग्रामीण भागातील पोलीस दलाला वाहनांची आवश्यकता होती. आज विजयादशमी सणाच्या पार्श्वभूमीवर ही वाहने पोलीस दलात सामील होत आहेत. त्यामुळे गुन्ह्यांची उकल करण्याकामी आणि गस्ती वाढविण्यासाठी उपयोग होईल. या वाहनांच्या मदतीने निर्मनुष्य असलेल्या इमारती, ठिकाणे येथे गस्ती वाढवावी आणि गुन्हेगारांवर वचक बसवावा, असे आवाहन शिंदे यांनी केले.



## एमबीएमसीच्या स्वच्छतागृहांमध्ये 'हात'सफाई?

वार्ताहर/भाईंदर

मीरा-भाईंदरमधील सुमारे २०० सार्वजनिक स्वच्छतागृहांच्या देखभाल दुरुस्ती खर्चात कोट्यवधी रुपयांचा घोटाळा झाल्याचे दिसून येत आहे. हा घोटाळा माहिती अधिकारातून पुढे आला आहे.

या स्वच्छतागृहांच्या दैनंदिन साफसफाई व देखभाल दुरुस्तीसाठी दिलेल्या सुमारे १८ कोटी रुपयांच्या वार्षिक ठेक्यात हा घोटाळा झाला आहे. अनेक स्वच्छतागृहांची दुरवस्था व अस्वच्छता असताना सफाई कामी नेमलेल्या कर्मचाऱ्यांची पिळवणूक करत नेमकी माहिती-संख्या नसताना तसेच देय सुविधा-भत्ते, किमान वेतन, बँकेत वेतन जमा करणे आदींचे उल्लंघन करून ठेकेदारास महापालिकेने कोट्यावधींचा फायदा करून दिल्याची माहिती हाती आली आहे. या प्रकरणी लोकायुक्त, पोलीस महासंचालक, लाच लुचपत प्रतिबंधक विभाग आदींना तक्रारी केल्या आहेत.

माहिती अधिकार कार्यकर्ते कृष्णा गुप्ता यांनी हे प्रकरण उघड केले आहे. याबाबतचे सविस्तर वृत्त असे की, मीरा-भाईंदर महापालिकेच्या बांधकाम विभागाने शहरातील सुमारे २०० सार्वजनिक शौचालयांची साफसफाई, देखभाल - दुरुस्ती साठी मेसर्स शाईन मेंटेनन्स सर्व्हिसेस प्रा.लिमिटेड या ठेकेदाराला ३ नोव्हेंबर २०२० रोजी ३ वर्षाच्या ठेक्याचे कार्यादेश दिले. त्यासाठी दरवर्षी सुमारे १८ कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित धरून ठेका दिला होता.

येथील प्रत्येक कर्मचाऱ्यास प्रति दिवस १ हजार ४६ रुपयांप्रमाणे तर पर्यवेक्षकास प्रति दिवस ११८७ रु. प्रमाणे ८ तासांच्या कामासाठी मोबदला देणे बंधनकारक आहे. त्या अनुषंगाने एका कर्मचाऱ्यास महीन्याचे ३१ हजार ३८० तर पर्यवेक्षकास महिन्याचे ३५ हजार ६१० इतके वेतन देय आहे. परंतु याबाबत काही कर्मचाऱ्यांकडे माहिती घेतली असता त्यांना महिन्याला केवळ ६ ते ७ हजार रुपये इतकेच वेतन ठेकेदार देत आहे.

वास्तविक करारातील अटीशर्ती आणि कायदे नियमानुसार प्रत्येक सफाई कामगारांचे बँक खाते उघडून पगार बँक खात्यातच जमा करणे बंधनकारक आहे. परंतु प्रत्यक्षात बहुतांश कामगारांचे बँक खातेच उघडलेले नाही. तर काहींचे खाते उघडले असले तरी नियमा प्रमाणे वेतन देऊन नंतर त्यांच्या एटीएम मधून पैसे काढले जातात. हातचे काम जाऊ नये म्हणून कामगार मुकाट्याने हे शोषण सहन करतो असे सूत्रांनी सांगितले आहे. प्रत्येक कामगाराची बायोमेट्रिक पद्धती ऐवजी साध्या रजिस्टरवर हजेरी घेतली जाते. मुळात भविष्य निवर्वाह निधी आदी शासकीय योजनांचा भरणा केल्याशिवाय ठेकेदाराचे देयक काढू नये असे शासन आदेश असून देखील सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अधिकाऱ्यांनी ठेकेदाराशी संगनमत करून काही कोटींची देयके अदा केली आहेत. त्यामुळे कागदावर दाखवली जाणारी व प्रत्यक्षातील संख्या आणि देयकात मोठा गैरप्रकार झाल्याचे समोर आले आहे. धक्कादायक बाब म्हणजे स्वतः ठेकेदारानेच २३ मार्च २०२१ रोजी पालिकेस पत्र देऊन, त्याच्या कडे काम करणाऱ्या कामगारांची कागदपत्रे नसल्यामुळे त्याने कामगारांचा भविष्य निर्वाह निधी, विमा आदीची रक्कमच भरली नसल्याचे स्वतःच कबुल केले आहे.

### गुन्हा दाखल करा

शासन निर्देश, अटीशर्तींचे उल्लंघन करून तसेच ठेकेदारासोबत संगनमताने महापालिकेने भ्रष्टाचार केला आहे. यात लोकप्रतिनिधी किंवा मोठा नेता गुंतलेला असण्याची शक्यता आहे. ठेकेदाराचा ठेका रद्द करून काळ्या यादीत टाका व भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यानुसार गुन्हा दाखल करा

– कृष्णा गुप्ता

## निवडक...

### शिवसेनेतर्फे मोफत आरोग्य शिबीर

**डोंबिवली :** कल्याण लोकसभा मतदार संघाचे खासदार डॉ. श्रीकांत शिंदे आणि स्व. बाबासाहेब ठाकरे वैद्यकीय कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने डोंबिवली शिवसेना शहर शाखेच्या सहकार्याने गुरुवारी सकाळी १० ते दुपारी ५ वाजेपर्यंत डोंबिवली पूर्वेकडील डीएनसी शाळेच्या पटांगणात रासरंग २०२१ येथे मोफत आरोग्य शिबीर भरविण्यात आले होते. या शिबिरात ईसीजी, किडनीस्टोन, कॅन्सर, नाक-कान-घसा तपासणी, नेत्रचिकित्सा, मोफत चष्मा वाटप, आरोग्य तपासणी करण्यात आली. मोतीबिंदू असलेल्या व्यक्तीचे मोफत ऑपरेशन केले जाणार आहे.

### श्री गोवर्धनी माता मंदिरात नवरात्रोत्सव

**नवी मुंबई :** सालाबादप्रमाणे किल्ले गावठाण बेलापूर येथील श्री गोवर्धनी माता मंदिरामध्ये नवरात्रोत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. आज नवरात्रीच्या नवमीनिमित्त नवचंडी होम पूजेचे आयोजन करण्यात आले होते. सदर पूजा आमदार मंदा म्हात्रे यांच्या कुटुंबियांच्या हस्ते संपन्न झाली. नवमीच्या दिवशी सर्व महिला भाविकांनी गुलाबी रंगाच्या साड्या परिधान केल्याने गुलाबमय वातावरण तयार झाले असल्याचे आमदार मंदा म्हात्रे यांनी सांगितले.

### रुग्णवाहिकेचे लोकार्पण

**पेण :** पेण वाशी येथील दक्ष सिक्यूरिटी सर्व्हिसचे सर्वेसर्वा प्रवीण पाटील यांच्यातर्फे दसऱ्याच्या मुहुर्तावर शुक्रवारी रुग्णवाहिकेचे लोकार्पण करण्यात येणार आहे. कोरोना काळात रुग्णवाहिका नसल्याने अनेक जणांना आपला जीवन गमवावा लागला. ही बाब लक्षात घेउन प्रवीण पाटील यांनी रुग्णवाहिका लोकसेवेसाठी देण्याचे ठरविले असून त्याचा लोकार्पण सोहळा पाटील यांचे वडील निवृत्त पोलीस उपनिरीक्षक गोपी पाटील यांच्या हस्ते होणार आहे.

### न्हावाच्या सरपंचपदी हरेश्वर म्हात्रे बिनविरोध

**उरण :** न्हावा ग्रामपंचायतीच्या सरपंचपदी ग्रामविकास आघाडीचे हरिश्चंद्र म्हात्रे ( भाजप) यांची बुधवारी (१३) बिनविरोध निवड झाली आहे. न्हावा ग्रामपंचायतीची सदस्य संख्या ११ आहे. ग्रामपंचायतींमध्ये भाजप, शेकाप, काँग्रेस अशी आघाडी आहे. मागील झालेल्या निवडणुकीत पाच वर्षांच्या सत्ताकाळात तीन वर्षांसाठी ग्रामविकास आघाडीचे सरपंचपद शेकापकडे तर दोन वर्षं भाजपकडे बहाल करण्याचा अलिखित करार करण्यात आला होता.

### पर्यावरण रक्षक पंधरवड्याचे आयोजन

**पनवेल :** भारतीय जनता पार्टी महाराष्ट्र प्रदेश विभागाकडून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त पर्यावरण रक्षक पंधरवाड्याचे आयोजन करण्यात आले असून, भाजप रायगड जिल्ह्याच्या वतीने पर्यावरण विषयी संगम, वाटिका, पर्यावरण चित्रकला, झाडासोबत सेल्फी अशा विविध स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. या स्पर्धेत पर्यावरण या विषयावर लहान गट (इयत्ता ५ वी ते ८ वी), मोठा गट (९ वी ते १२ वी) या गटातील विद्यार्थ्यांना चित्रकला स्पर्धेत सहभागी होता येणार आहे. या स्पर्धेत लहान गट व मोठ्या गटासाठी प्रथम पारितोषिक २००० रुपये जाहीर केले आहे.

## मास्क नाही, लस नाही, प्रवेश नाही

### एमबीएमसी आयुक्त दिलीप ढोले यांचे आदेश

वार्ताहर/भाईंदर

कोरोनाच्या संभाव्य तिसऱ्या लाटेच्या पार्श्वभूमीवर नागरिकांचे लसीकरण जलद गतीने करण्यास प्राधान्य देण्यासाठी मिरा-भाईंदर मनपा आयुक्तांनी लसीकरण झालेल्या नागरिकांनाच हॉटेल, कार्यालय, बँक व इतर ठिकाणी प्रवेश देण्याचे आदेश दिले आहेत. परिणामी लस न घेतलेल्या नागरिकांना प्रवेश देण्यास मनाई असणार आहे. तसेच या आदेशाची अंमलबजावणी न केल्यास कारवाई केली जाणार आहे .

संभाव्य तिसऱ्या लाटेचा प्रादुर्भाव व तीव्रता कशी कमी करता येईल, या दृष्टीने प्रशासनाकडून उपाययोजना केल्या जात आहेत. त्यानुसार १८ वर्षावरील नागरिकांचे लसीकरण जलद गतीने पूर्ण करण्यास प्राधान्य दिले जात आहे.

मिरा-भाईंदरमधील आतापर्यंत २ लाख ७६ हजार ९२३ नागरिकांनी लसींच्या दोन मात्रा घेतल्या आहेत. उर्वरित नागरिकांचे लसीकरण जलद गतीने पूर्ण करण्यासाठी राज्य शासनाच्या मिशन कवच कुंडल अंतर्गत विशेष मोहीम मिरा-भाईंदर महापालिका प्रशासनाकडून राबवली जात आहे. या मोहीमेत सहभागी होऊन नागरिकांचे लसीकरण लवकर पूर्ण व्हावे, याकरता मनपा आयुक्त दिलीप ढोले यांनी शहरातील हॉटेल्स, मॉल्स, दुकान, रुग्णालय , बँका, विविध खासगी व शासकीय कार्यालये, गृहसंकुलात १८ वर्षावरील लसीकरण झालेल्या नागरिकांची माहिती घेऊनच त्यांना प्रवेश देण्यात यावा, असे आदेश बुधवारी दिले आहेत. या आदेशानुसार कार्यवाही करण्यास टाळाटाळ किंवा विरोध दर्शविल्यास संबंधितांच्या विरुध्द कायदेशीर कारवाई करण्यात यावी, असेही आयुक्तांनी सांगितले.

## पेणमधून ८२ लाखांची दारु जप्त

वार्ताहर/पेण

दसरा-दिवाळी सणाच्या तोंडावरच राज्य उत्पादन शुल्क विभागाने तब्बल ८२ लाख रुपयांची दारु पकडली आहे. मुंबई-गोवा महामार्गावरील पेण तालुक्यातील गडब येथे १३ ऑक्टोबरच्या मध्यरात्री ही कारवाई करण्यात आली.

याप्रकरणी तीन आरोपींना बेड्या ठोकण्यात आल्या आहेत. मुंबईच्या राज्य उत्पादन शुल्क विभागाने रायगड हद्दीत ही कारवाई केली. यावेळी रायगडचे राज्य उत्पादन शुल्क विभाग गाढ झोपेत होते का, असा सवाल त्या निमित्ताने उपस्थित केला जात आहे.

याप्रकरणी अटक केलेल्यांमध्ये ट्रक चालक मोहम्मद असिफ, क्लिनर पवन कुमार माहतो, जयेश भावसार यांचा समावेश आहे. त्यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरची कारवाई गेल्या दोन वर्षातील सर्वात मोठी असल्याचे सांगण्यात येते.



मुंबई-गोवा महामार्गावर गोवा राज्यातून मुंबईकडे एका ट्रकमधून विदेशी बनावटीच्या मद्याची वाहतूक होणार असल्याची माहिती मुंबईच्या भरारी पथकाला मिळाली होती. त्यानुसार १३ ऑक्टोबरच्या मध्यरात्री पेण तालुक्यातील मौजे खारडोंबी गावाच्या हद्दीतून जाणाऱ्या महामार्गावरील गडब येथे मुंबई पथकाने सापळा रचला. त्यानंतर ट्रकला अडवून पथकाने झाडाझडती घेतली. ट्रकमध्ये १८० मिलीच्या व्हिस्कीच्या ४८ बाटल्यांनी भरलेले ३८० बॉक्स, १८० मिलीच्या गोवा व्हिस्कीच्या ४८ बाटल्यांनी भरलेले ६२० बॉक्स एकूण एक हजार बॉक्स, तीन मोबाईल आणि ट्रकसह ८२ लाख ६२ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. ही कारवाई राज्य उत्पादन शुल्क आयुक्त कांतीलाल उमप याचे आदेशानुसार कोकण उप आयुक्त सुनील चव्हाण, संचालक उषा वर्मा याच्या मार्गदर्शनाखाली निरीक्षक संताजी लाड, मनोज चव्हाण, अशोक तारू, पी एस कांबळे, अमोल चिलगर, धनाजी दळवी, सुभाष रणखांब या पथकाने केली आहे.

## मनुष्यबळाच्या अभावामुळे कळवा रुग्णालयातील प्रसूती विभागाची ओपीडी बंद

वार्ताहर/ठाणे

नेहमी वादाच्या भोवऱ्यात अडकणारे कळव्यातील छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालय आज पुन्हा अपुऱ्या कर्मचाऱ्यांमुळे प्रकाशात आले आहे. कर्मचाऱ्यांची भरती न केल्यामुळे रुग्णालयातील प्रसूती विभागाची ओपीडी बंद करण्याची वेळ रुग्णालय प्रशासनावर आली आहे.

रुग्णालयात ठाणे शहरासह ठाणे आणि पालघर जिल्ह्यातील गरीब मध्यमवर्गीय गर्भवती महिला तपासणीसाठी येतात. मात्र कर्मचारी अपुरे असल्याने पुढील आदेश येण्यापर्यंत बाह्यरुग्ण विभाग बंद ठेवल्याने येथे येणाऱ्या हजारो महिलांची गैरसोय झाली आहे.

प्रसूती विभागात काम करणाऱ्या निवासी डॉक्टरांच्या सध्या परीक्षा सुरू आहेत, तर काही कर्मचारी रजेवर आहेत. महापालिका प्रशासनाने येथे डॉक्टर व परिचारिका अन्य कर्मचाऱ्यांची स्वतंत्र भरती न केल्यामुळे अपुऱ्या कर्मचाऱ्यांअभावी हा बाह्य रुग्ण विभाग बंद असल्याचा फलक बाहेर लावण्यात आला आहे. रुग्णालयातील प्रसूती विभाग कक्ष क्रमांक ६ मध्ये सध्या ज्या गर्भवती महिलेने नोंदणी केली होती, अशा नॉर्मल प्रसूती रुग्णाला दाखल करून घेतले जात आहे. त्यामुळे वर्षभर नेहमी गजबजून जाणारा प्रसूतीविभाग कक्ष सध्या काही प्रमाणात ओस पडला आहे.




डॉक्टरांच्या परीक्षा सुरू असून विभागात कर्मचाऱ्यांची संख्या कमी आहे, त्यामुळे थोडी अडचण निर्माण होत आहे. भरतीबाबत निर्णय अंतिम टप्प्यात असून पुढील काही दिवसांत यामध्ये पर्याय उपलब्ध होईल.

– डॉ. भीमराव जाधव, अधिष्ठाता

## वसई-विरारमधील शिवसैनिकांना बळ देणार : दादा भुसे

वार्ताहर/वसई

वसई-विरारमधील शिवसैनिक प्रामाणिक आणि निष्ठावान असून, चांगल्या आणि वाईट अशा दोन्ही प्रसंगी तो सदैव शिवसेनेसोबत राहिला आहे. त्यामुळे लहानतल्या लहान शिवसैनिकाला बळ आणि प्रेरणा देण्याचे काम शिवसेनेच्या माध्यमातून आम्ही करणार आहोत, असे प्रतिपादन पालकमंत्री दादा भुसे यांनी केले आहे. शिवसेना आमदार व पालघर संपर्क प्रमुख रवींद्र फाटक यांच्या संकल्प प्रतिष्ठान आयोजित 'दुर्गोत्सवा'ला कृषिमंत्री व पालघर जिल्ह्याचे पालकमंत्री दादा भुसे यांनी नुकतीच भेट दिली.

राज्याचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या हाकेला साद देत आणि नगरविकास मंत्री व शिवसेना नेते एकनाथ शिंदे यांच्या संकल्पनेतून आयोजित करण्यात आलेल्या 'महारक्तदान' शिबिराचा धागा पकडत साधलेल्या अनौपचारिक संवादादरम्यान वसई-विरार व पालघर-बोईसर जिल्ह्यातील शिवसैनिकांचे दादा भुसे यांनी कौतुक केले.

या रक्तदान शिबिरात वसई-विरार व पालघर-बोईसर जिल्ह्यातील शिवसैनिकांनी उत्स्फूर्तपणे रक्तदान केले आहे. शिवसेनेसोबत रक्ताची नाळ असल्याशिवाय हे शक्य नाही, अशी भावना दादा भुसे यांनी व्यक्त केली.

वसई-विरार महापालिकेच्या आगामी निवडणुकीदरम्यान वेळ प्रसंगी धोरणात्मक निर्णय घेतले जातील. आवश्यक बदल केले जातील. मात्र येणारा काळ कसा आहे, हे पाहून ही रणनीती ठरवली जाईल. विजय मिळवायचा तर रणनीती आखावीच लागते. त्याला जर-तरचे लेबल लावून चालत नाही. माध्यमांनी तसे आडाखे बांधू नयेत, असे म्हणत शिवसेनेची घोड़दौड़ पुढेही वेगाने सुरूच राहील, असे संकेत त्यांनी दिले.

**ई-लिलाव-श्री हनुमान टेक्सफॅब प्रायव्हेट लिमिटेड**
**(समापनातील)**
इन्सॉल्व्हन्सी ॲण्ड बॅकरप्टसी कोड, २०१६ अंतर्गत चालु कंपनी म्हणून कंपनीची विक्री
सीआयएनः यु१७१२१एमएच२००९पीटीसी१९२३३२

इन्सॉल्व्हन्सी ॲण्ड बॅकरप्टसी कोड, २०१६ आणि त्या अंतर्गत रेग्युलेशन्स अन्वये जनतेला सूचना याद्वारे देण्यात येते की, चालु कंपनी म्हणून श्री. हनुमान टेक्सफॅब प्रायव्हेट लिमिटेड - समापनातील (कॉर्पोरेट कर्जदार) ची विक्री प्रक्रिया वेबसाईट https://nbid.nesl.co.in/ द्वारे सेवा पुरवठादार नॅशनल ई-गव्हर्नन्स सर्व्हिसेस लि. मार्फत ई-लिलावाने करण्यात येणार आहे.

| मत्तेचा तपशील | विक्रीची पध्दत | ब्लॉक | राखीव किंमत (रु. कोटीत) | इसारा अनामत रक्कम (रु. कोटीत) | वाढविण्याचे मुल्य (रु. लाखात) |
|---|---|---|---|---|---|
| आयबीबीआय लिक्विडेशन प्रोसेस, रेग्युलेशन, २०१६ च्या रेग्युलेशन ३२(ई) नुसार **चालु कंपनी म्हणून श्री. हनुमान टेक्सफॅब प्रायव्हेट लिमिटेडची विक्री** (कंपनी स्पिनिंग मिले काम करते) फॅक्टरी युनिट सर्व्हे क्र. ९३/२/१पी, ९३/२/१, ९३/१/२भाग, ९३/४/१, ९३/४/२ आणि ९३/५/१, भिवंडी वाडा रोडलगत, गाव गंधारे, तालुका वाडा, जिल्हा पालघर, महाराष्ट्र ४२१३०३ | चालु कंपनी म्हणून विक्री | १ | २१.०० | २.०० | ५.०० |

| | |
|---|---|
| लिलावाची तारीख आणि वेळ | ०९ नोव्हेंबर, २०२१ रोजी स. १०.३० ते दु. ३.३० |
| ईओआय आणि इएमडी सादर करण्याची अंतिम तारीख | ०६ नोव्हेंबर, २०२१ सायं. ७.०० पूर्वी |
| निरिक्षणाची तारीख आणि वेळ | ०६ नोव्हेंबर, २०२१ रोजी किंवा पूर्वी स. १०.०० ते दु. ४.०० |

इच्छुक पक्षकार www.shreehanumantexfab.co.in वर उपलब्ध ई-लिलावाच्या अटी आणि शर्तीचा तपशील समाविष्ट संपूर्ण ई-लिलाव प्रक्रिया दस्तावेजांचा संदर्भ घेवू शकतात. परिसमापकांना कोणत्याही वेळी ई-लिलावाच्या कोणत्याही अटी रद्द करणे किंवा वाढविणे किंवा सुधारण्याचा हक्क आहे. परिसमापकांना कोणतेही कारण न देता कोणतीही बोली नाकारण्याचा हक्क आहे.

**गणेश वेंकटा शिवा रामा क्रिश्ना रेमानी**
परिसमापक- श्री हनुमान टेक्सफॅब प्रायव्हेट लिमिटेड
आयबीबीआय रजि. क्र.: आयबीबीआय/आयपीए-००१/आयपी-पी०१३८६/२०१८-१९/१२१७६
पत्रव्यवहाराचा पत्ताः ३०२, नाहर बिझेनेस सेंटर, चांदिवली, मुंबई ४०००७२
ईमेल आयडीः liqshreehanumantexfab@gmail.com
संपर्क क्र. - +९१ ९९६७५ ०००१०

दिनांकः १५.१०.२०२१
ठिकाणः मुंबई

# जीवदानी मातेमुळे पालटले विरारचे रुप

अनिलराज रोकडे/वसई

महाराष्ट्रातील अनेक शक्तिपीठांपैकी एक असलेली विरारची जीवदानी माता भाविकांमध्ये प्रसिद्ध आहे. उंच डोंगरावर कडेकपारीत वसलेल्या या देवीचे दर्शन घेण्यासाठी भाविकांची रीघ लागते. केवळ वसई आणि राज्यभरातूनच नव्हे, तर गुजरात, राजस्थान, उत्तर प्रदेश येथील भाविक सुद्धा येथे येत असतात.

या गडावर १७ व्या शतकाच्या सुमारास जीवधन किल्ला होता. काळाच्या ओघात या किल्ल्याचे अस्तित्व नष्ट झाले. अज्ञात शिल्पकारांनी तयार केलेल्या गुंफा आजही येथे आहेत. हे पांडवकालीन मंदिर असल्याचे भाविक सांगतात.

मातेच्या वास्तव्याच्या अनेक आख्यायिका आहेत. गडाच्या पायथ्याशी शेतात अनोळखी गाय नित्यनेमाने चरण्यासाठी येत असे. पण ती गाय कोणाची हे समजले नाही. दिवसभर ती चरायची आणि संध्यासमयी निघून जायची. एक दिवस शेताचा मालक त्या गायीच्या पाठोपाठ जाऊ लागला. ती गाय पूर्वेकडील डोंगरावर चढू लागली. तसा तोही डोंगर चढून गेला. डोंगरावर जिथे मैदानी जागा होती तिथे ती गाय थांबली. त्याचक्षणी तेजस्वी स्त्री तिथे प्रकटली. शेतकऱ्याला वाटले हीच त्या गायीची मालकीण असावी, त्याने तिच्याजवळ चाऱ्याचे पैसे मागितले. पैसे काढून त्या शेतकऱ्याच्या हातावर ठेवणार तोच तो म्हणाला, बाई, मी अस्पृश्य आहे. मला स्पर्श करू नकोस.' हे शब्द कानावर पडताच ती स्त्री नाहीशी झाली. शेतकरी अवाक् झाला. त्याचक्षणी गायीने हृदयविदारक हंबरडा फोडला आणि कड्यावरून स्वत:ला झोकून दिले. या बलिदानाचे रहस्य अजून कोणाला उलगडले नाही. पण तिने आपल्या जीवाचे दान केले म्हणून या डोंगराला जीवदानीचा डोंगर व तेथे वास करणारी आदिमाता म्हणून जीवदानी देवी प्रसिद्ध झाली.

२३ फेब्रुवारी १९५६ मध्ये जीवदानी मंदिर ट्रस्टची स्थापना झाली. जीवदानीचा डोंगर हा वनखात्याचा असला तरी वनीकरणासाठी येथील जीवदानी मंदिर ट्रस्टला देण्यात आला आहे.

१९४६ ते ५६ या काळात बारकीबाय नावाची भक्त रोज गडावर जाऊन नेमाने देवीची पूजा करीत असे. त्यानंतर १९५६ मध्ये देवीच्या भक्तांनी मूर्तीची प्राणप्रतिष्ठापना केली. तब्बल ९०० फूट उंचावर असलेल्या या मंदिराकडे जाण्यासाठी पायऱ्यांची सोय करण्यात आली आहे. मंदिराचा गाभारा पाच ते सहा फूट उंच पाषाणात खोदलेला आहे. आतमध्ये देवीची सुबक मूर्ती असून तिच्या डोईवर सुवर्ण मुकुट आहे. सौम्य शीतल, प्रसन्न अशा या मूर्तीच्या डाव्या हाती कमलपुष्प आहे. तर उजव्या हाताने माता भाविकांना आशीर्वाद देत आहे. त्यापूर्वी देवीची लाकडी मूर्ती होती. अरूंद पायवाट व कुठल्याही सुविधा नसलेले असे हे स्थान होते. हळुहळू मंदिराचा जीर्णोद्धार होत गेला. जुन्या मातीच्या पायऱ्या होत्या. त्यानंतर १९९१ मध्ये जवळपास सव्वा हजार सिमेंटच्या पायऱ्या बांधण्यात आल्या. या चढून उंचावरील जीवदानी मंदिरात जावे लागते. डोंगरावर चढताना दुतर्फा हिरवीगार वनराजी आहे. मंदिरात जाण्यासाठी पायऱ्यांशिवाय पाचपायरी हा जुना मार्ग असून येथून भाविक पायवाटेने जातात. विविध नवस करणे आणि ते फेडण्यासाठी भाविक आजही या मार्गाची निवड करतात. मार्ग डोंगराळ आहे. जवळपास २० वर्षांपूर्वी जीवदानी देवीचे भव्य मंदिर बांधण्याचे काम सुरू झाले. डोंगराच्या कुशीत उभी राहिलेली सात मजली इमारत बांधण्यास अनेक वर्षे लागली. देवीच्या मूर्तीसमोर भव्य सभामंडप असून त्यात पाच हजारांहून अधिक भाविक बसू शकतात.

मंदिराच्या गर्भगृहाला लागून अरूंदशी श्रीकृष्ण गुहा आहे. शिवाय काळभैरव, महाकाली, बारोंडा मंदिरेही आहेत. तसेच गायगोठा व वाघोबा मंदिरे असून ती छोट्या गुंफेत आहेत. शेजारी पाण्याची कुंडे असून मानकुंड नावाने ती ओळखली जातात. पायथ्याशी असलेल्या श्री गणेश मंदिरात वंदन करून भाविक डोंगरावर येतात.



## असा होतोय परिसराचा कायापालट

सध्या डोंगरावरील पायऱ्या व विश्रांती शेडचे नूतनीकरण होत आहे. परिसरात ९० सीसीटीव्ही असून इंटरनेटवर लाईव्ह दर्शन घेण्याचीही सोय आहे. डोंगरावर सात मजली इमारतीचे काम सुरू असताना दहा वर्षांपूर्वी बांधकाम साहित्य डोंगरावर नेण्यासाठी एक ट्रॉली सुरू झाली. तिचे रूपांतर रोपवे मध्ये झाले. पायथा ते डोंगरावर जाण्यासाठी दोन रोपवे मधून ज्येष्ठ नागरिकांसह इतर लोकही जाण्याचा आनंद घेत. दोन वर्षेपूर्वी हा रोप-वे बंद करण्यात येऊन, ट्रस्ट तर्फे आता त्या जागी फेनिक्युलर ट्रॉली (छोटी ट्रेन) सुरु करण्यात आली असून, रुळावरून ये-जा करणारी ही ट्रेन एका वेळी सुमारे शंभर प्रवासी वाहून नेते. मात्र लॉकडाऊन काळात बंद पडलेली ही ट्रेन मेंटनन्सचे काम अधिक निघाल्यामुळे बंद असून भक्तांना पायऱ्यांचा एकमेव पर्याय सध्या आहे.

यासोबतच जीवदानीचा डोंगर हरित ठेवण्यासाठी ट्रस्ट दरवर्षी वृक्षलागवडीसाठी मोठा खर्च करत आहे. ट्रस्टच्या पाच मोबाईल ॲम्ब्युलन्स असून या गावोगावी जाऊन आरोग्यसेवा पुरवितात. मंदिर पायथ्याशी ट्रस्टचा दवाखाना सुरू आहे. मंदिरात जमा होणाऱ्या निर्माल्यातून खतनिर्मिती केली जाते. तसेच, देवीला हजारो भाविक नारळ अर्पण करतात. त्यातून नारळवडीचा प्रसाद भाविकांना दिला जातो. ट्रस्टच्या वतीने दहा रूपयात घरगुती पोटभर जेवणही येथे भाविकांना दिले जाते. दर्शनाला येणाऱ्या भाविकांच्या वाहनांसाठी पार्किंगची पुरेशी सोय आहे. ट्रस्टने गडावर कोंबड्या किंवा बकरे कापण्यास बंदी घातली आहे. नवरात्रात मंदिराला विद्युत रोषणाई आणि दरदिवशी फुलांची आकर्षक सजावट केली जाते. देवी मूर्तीच्या बाजूला पाषाण आहे. या पाषाणावर सुपारी चिकटवून देवीचा कौल घेण्यासाठीही भाविक आवर्जून येतात. मंदिराचा परिसर हिरव्यागार वनराईने नटलेला आहे. निसर्गाच्या कुशीत आणि डोंगराच्या कपारीत तब्बल सात मजल्याची भव्य इमारत जीवदानी मंदिराचा साज घेऊन उभी आहे.

